ePaper

# अजित पवारांनी स्वत:च्या नावासमोर मुख्यमंत्री लावावं: शशिकांत शिंदे



वर्ष - 7 । अंक -13 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

### आतील पानांत


- मुंबई-पुणे महामर्गावर भयंकर प्रकार!
- पुणेकरांनो, मुलांना सांभाळा!
- बाणेर-बालेवाडी लवकरच 'टँकरमुक्त'!


www.mahaenews.com । मंगळवार, दि. 9 मे 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews



# पवना धरणग्रस्तांचा संयम सुटला!

## » आज पाणी बंद आंदोलन : आजी-माजी आमदारांचा पाठिंबा

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पवना धरणग्रस्तांचे पुनर्वसन तसेच विविध मागण्यांसाठी मंगळवारी (ता. ९) पवना धरण येथे पाणी बंद आंदोलन करणार असल्याचे संयुक्त संघटनेच्या वतीने सांगण्यात आले. पवना धरणग्रस्त शेतकऱ्यांना सरकारने यापूर्वी ३४० खातेदारांना प्रत्येकी चार एकर जागा देऊन पुनर्वसन केले आहे. धरणग्रस्तांच्या विविध मागण्यांसाठी हे आंदोलन करण्यात येणार आहे. मंगळवारी सकाळी पवनानगर बाजारपेठेतून मोर्चा काढण्यात येणार आहे.**



तसेच तो धरणाच्या बांधावर नेण्यात येईल. धरणग्रस्तांच्या प्रश्नावर निर्णय होईपर्यंत हे पाणी बंद आंदोलन सुरू राहणार असल्याचा इशारा पवना धरणग्रस्त संयुक्त संघटनेने दिला आहे. आंदोलनात धरणग्रस्त शेतकरी, विविध सामाजिक संघटना, विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी व कार्यकर्ते, शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहे.

### सरकारने अंत पाहु नये : शेळके

» पवना धरणग्रस्तांच्या पाणी बंद आंदोलनाला आमदार सुनील शेळके यांनी जाहीर पाठिंबा दिला आहे. पवना धरणग्रस्तांचे पुनर्वसन अनेक वर्षांपासून रखडले आहे. लोकप्रतिनिधी म्हणून मी सातत्याने या बाबत सरकार दरबारी पाठपुरावा केला आहे. पुनर्वसन अहवालात त्रुटी आहेत. कोणीही वंचित राहू नये, यासाठी धरणग्रस्त संयुक्त संघटनेच्या माध्यमातून सरकार दरबारी लढत आहे. सरकारने अधिक अंत पाहू नये, असा इशारा आमदार सुनील शेळके यांनी दिला आहे.



### शेतकऱ्यांना न्याय मिळेल : भेगडे

» माजी राज्यमंत्री बाळा भेगडे यांनीही धरणग्रस्त शेतकऱ्यांच्या या आंदोलनाला पाठिंबा दिला असून, त्यांनी केलेल्या सर्व मागण्या योग्य असून, सरकारच्या पातळीवर मी लक्ष घालून जलसंपदा खाते हे देवेंद्र फडणवीस यांच्याकडे असून, महसूल व जलसंपदा या दोन खात्यांकडे हा विषय आहे. सरकारने यामध्ये धोरणात्मक निर्णय घेऊन त्याचा पाठपुरावा करून योग्य न्याय मावळच्या शेतकऱ्यांना मिळेल, असे भेगडे यांनी सांगितले.



### धरणगस्तांच्या मागण्या

- » उर्वरित धरणग्रस्त शेतकऱ्यांचे पुनर्वसन करावे
- » महापालिकेत व औद्योगिक वसाहतीत धरणग्रस्त तरुणांना रोजगार मिळावा
- » धरणग्रस्त शेतकऱ्यांना घरांसाठी प्लॉट मिळाले नाही, त्यांना ते त्वरित मिळावेत
- » धरणग्रस्तांना प्रकल्पबाधित असल्याचे दाखले मिळावेत

# पुणे-मुंबई एक्स्प्रेस-वेवरील वाहतूक कोंडी कमी होणार!

## मिसिंग लिंकमुळं अंतर 45 मिनिटांनी होणार कमी

। पुणे। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुणे-मुंबई एक्स्प्रेस-वे (द्रुतगती महामार्ग) आणि जुन्या पुणे-मुंबई महामार्गावरून घाटात एकत्र येणारी वाहतूक कमी करण्यासाठी महत्त्वाचा असणाऱ्या 'मिसिंग लिंक' प्रकल्पाचे ७२ टक्के काम पूर्ण झाले आहे. पुढील वर्षीच्या मार्चपासून वाहनचालकांना या रस्त्याचा वापर करता येणे शक्य होणार आहे. घाटात सातत्याने होणारे अपघात आणि वाहतूक कोंडी कमी होण्याच्या दृष्टीने हा प्रकल्प महत्त्वाचा ठरणार असल्याने तो लवकर पूर्ण व्हावा, यासाठी राज्य रस्ते विकास महामंडळाकडून (एमएसआरडीसी) प्रयत्न करण्यात येत आहेत.**



पुणे-मुंबई दरम्यान वेगवान प्रवासासाठी एक्स्प्रेस-वेचा वापर करणाऱ्या वाहनांची संख्या सातत्याने वाढत आहे. विशेषत: शनिवार-रविवार आणि जोडून येणाऱ्या सुट्ट्यांच्या कालावधीत एक्स्प्रेस-वेवरील घाटातला टप्पा पार करण्यासाठी बराच कालावधी लागतो. त्यामुळे 'मिसिंग लिंक' हा प्रकल्प हाती घेण्यात आला होता. त्याचे काम सध्या वेगाने केले जात असून, आठ किमीचे दोन बोगदे आणि मोठा दरी पूल ही या प्रकल्पाची वैशिष्ट्ये आहेत. त्यातील बोगद्यांचे खोदकाम पूर्ण झाले असून, दरीपुलाचे काम (व्हायडक्ट) प्रगतीपथावर आहे.

### महत्त्वाचे...

- 'मिसिंग लिंक' प्रकल्पाचे सध्या ७२ टक्के काम पूर्ण झाले आहे.
- उर्वरित कामे पूर्ण करण्यासाठी आणखी चार ते सहा महिन्यांचा कालावधी लागणार.
- बोगद्यांची कामे पूर्ण झाली असून, बोगद्यांतील रस्ते बांधण्याचे काम सध्या सुरू आहे.
- दोन पुलांपैकी एका पुलाचे काम पूर्ण झाले आहे. या दरीपुलाची उंची १८० मीटर असून, लांबी ५५० मीटर एवढी आहे.

"लॉकडाउनच्या काळात या कामाला फटका बसला होता. त्यानंतर वेगाने कामे केली जात असून, बोगद्यांतील कामे पुढील काही महिन्यांत पूर्ण होतील. त्यानंतर दरी पुलाचे काम निर्धारित वेळेत पूर्ण करून पुढील वर्षी मार्चपासून हा संपूर्ण रस्ता पुणे-मुंबई दरम्यानच्या प्रवासासाठी खुला करण्याचा प्रयत्न आहे.

- राहुल वसईकर, अधीक्षक अभियंता, रस्ते विकास महामंडळ

### अंतर 45 मिनिटांनी होणार कमी

एक्स्प्रेस-वेवर खालापूरच्या पुढे १.६ किलोमीटरचा आणि लोणावळ्याच्या दिशेने ८.९ किलोमीटर लांबीचे दोन बोगदे हे या प्रकल्पाचे प्रमुख वैशिष्ट्य आहे. या दोन्ही बोगद्यांच्या दरम्यान दरी पूल आहे. खोपोलीपासून ते लोणावळ्यापर्यंतच्या घाटाचे अंतर २२ किलोमीटरचे आहे. घाटातील गर्दी टाळण्यासाठी 'मिसिंग लिंक' तयार केली जात आहे. त्यामुळे आठ ते १० किलोमीटरचे अंतर आणि ४५ मिनिटांचा कालावधी वाचणार आहे.

### 'मिसिंग लिंक'मध्ये अवजड वाहनांना प्रवेश नको

पुणे-मुंबई एक्स्प्रेस-वेवर सध्या शनिवार-रविवार आणि सुट्टीच्या दिवशी खूप मोठ्या रांगा लागतात. घाटामध्ये ट्रकचालक सर्व लेनमधून वाहने चालवत असल्याने छोट्या वाहनांना पुढे जाण्यास रस्ताच मिळत नाही. परिवहन विभागाने गेल्या काही महिन्यांत नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई सुरू केल्यानंतर काही काळ ट्रकचालक एकाच लेनमधून पुढे जात होते; पण कारवाई काहीशी थंडावल्यानंतर पुन्हा घाटात कोंडी होत आहे. 'मिसिंग लिंक' सुरू झाल्यानंतर खोपोली ते लोणावळा दरम्यान दोन स्वतंत्र मार्ग उपलब्ध होणार आहेत. त्यामुळे 'मिसिंग लिंक'वरील बोगदे आणि दरी पुलावरून हलक्या आणि लहान वाहनांना प्रवेश द्यावा आणि ट्रकचालकांना सध्याच्या मार्गानेच पुढे जाण्यास परवानगी देण्याची गरज आहे. अन्यथा, 'मिसिंग लिंक' सुरू झाल्यानंतर तेथील बोगद्यांत किंवा दरी पुलावर अचानक ट्रक निकामी झाल्यास अथवा काही अपघात झाल्यास पुन्हा नव्या मार्गावर कोंडी निर्माण होण्याचा धोका आहे. त्यामुळे सरकारने आतापासूनच त्याचे नियोजन करून मार्ग खुला झाल्यावर योग्य तो निर्णय घ्यावा.

# माऊलींचा पालखी रथ ओढण्याचा मान आळंदीमधील भोसले कुटुंबाला

## सर्जा-राजा बैलजोडी सज्ज : कर्नाटकमधून खिलार जातीची बैलजोडी विकत आणली आहे

।पुणे। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा ११ जून ला पंढरपूकडे प्रस्थान ठेवणार आहे. यावर्षी माऊलींचा रथ ओढण्याचा मान आळंदीमधील भोसले कुटुंबाच्या सर्जा- राजा बैलजोडीला मिळाला आहे. २००१, २०११ नंतर आता यावर्षी पुन्हा भोसले यांच्या बैलजोडीला हा मान तिसऱ्यांदा मिळाला आहे. रथ ओढण्यासाठी भोसले कुटुंबाने कर्नाटकमधून खिलार जातीची बैलजोडी विकत घेतली आहे अशी माहिती संतोष तुळशीराम भोसले यांनी दिली.**


संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज यांचा ११ जून रोजी पालखी सोहळा सुरू होत आहे. दरवर्षी प्रमाणे यावर्षी देखील महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून या सोहळ्याला वारकरी उपस्थित राहणार आहेत. लाखो वारकरी या सोहळ्याचा याची देही याची डोळा सोहळा अनुभवत असतात.

यावर्षी माऊलींचा पालखी रथ ओढण्याचा मान भोसले कुटुंबाच्या सर्जा- राजा बैलजोडीला मिळाला आहे. कर्नाटकमधील राजापूर गावातून खिलार जातीची बैलजोडी भोसले कुटुंबाने साडेतीन लाखात विकत घेतली आहे. सध्या या बैलजोडीची निगा भोसले कुटुंब









राखत आहे. गेल्या कित्येक वर्षांपासून पिढ्यानपिढ्या भोसले कुटुंब हे माऊलींची सेवा करत आहे.

"सर्जा- राजा बैलजोडीची निवड करत असताना बैलजोडी ही बलवान आणि संयमी आहे का? हे पाहिलं. बैल किमान दहा किलोमीटर चालायला हवेत. ते रथ, बैलगाडी ओढू शकतात असे निकष असलेली परिपूर्ण सर्जा – राजा बैलजोडी विकत घेतली आहे" अशी माहिती संतोष भोसले यांनी दिली आहे. ११ जून ला माऊलींचा पालखी सोहळा प्रस्थान ठेवणार आहे. त्याअगोदर बैलजोडीची अत्यंत काळजी घेतली जाते. पेंड, मका, गव्हाची कणिक त्यात गावरान तूप टाकून त्याचा खुराक बैलजोडीला दिला जातो. यावर्षीचा संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराजांचा १९२ वा पालखी सोहळा असणार आहे. लाखो वारकरी या सोहळ्याचा याची देही याची डोळा सोहळा अनुभवत असतात.

# फेरीवाले, हातगाडीवाल्यांचा 'चक्का जाम'!

## प्रशासनाच्या कारवाईचा निषेध : पथ विक्रेता कायद्याची अंमलबजावणी करण्याची मागणी

। पिंपरी । । महाईन्यूज । प्रतिनिधी।

केंद्र शासनाच्या स्मार्ट सिटी योजनेत पॅन सिटीचा भाग म्हणून निवड करण्यात आलेल्या बाणेर-बालेवाडीसाठी महापालिकेकडून यंदाच्या उन्हाळ्यात मुबलक पाणी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. वारजे जलशुद्धीकरण केंद्रातून थेट पाणी पुरवठा करण्यासाठी सुमारे 23 किलोमीटरची ट्रान्समिशन लाइन टाकण्याचे तब्बल 22.500 किलोमीटर जलवाहिनी टाकण्याचे काम पूर्ण झाले आहे. पुढील 10 दिवसांत उर्वरीत 500 मीटरचे काम पूर्ण केले जाणार आहे. त्यामुळे, या भागातील तब्बल 5 ते 7 लाख नागरिकांना टँकरपासून मुक्ती मिळणार आहे.



पिंपरी-चिंचवड शहरातील अ ते ह सर्वच क्षेत्रीय कार्यालयाच्या अंतर्गत आयुक्त शेखर सिंह यांच्या आदेशाने सुरु असलेल्या जप्ती कारवाईचा निषेध करत आणि पथ विक्रेता कायद्याची अंमलबजावणी करा, सर्वांना परवाने व आधी हॉकर झोन नंतरच कारवाई अन्यथा जेलभारो आंदोलनाचा इशारा देत शहरातील, हातगाडी स्टॉल धारकांनी हातगाडीसह महापालिका गेटसमोर हातगाड्या लावून चक्काजाम आंदोलन केले.

नॅशनल हॉकर फेडरेशन, कष्टकरी संघर्ष महासंघ, महाराष्ट्र फेरीवाला क्रांती महासंघ यांच्या तर्फे कामगार नेते काशिनाथ नखाते यांच्या नेतृत्वामध्ये हे आंदोलन करण्यात आले. यावेळी प्रदेश संघटक अनिल बारवकर, कार्याध्यक्ष इरफान चौधरी, राजू बिराजदार, गणेश जगताप,राजेश माने, प्रमोद गवई,किरण साडेकर, विठ्ठल कड,राजू खंडागळे, दत्ता जाधव, सागर ठोंबरे, नवनाथ जगताप, सलीम डांगे, विजय दिवटे,सलीम शेख,यासीन शेख,माधुरी जलमुलवर,स्मिता मसुरे, वृषाली पाटणे,अंजु तायडे,मुमताज शेख,जरीता वाठोरे,नंदा तेलगोटे, वहिदा शेख, मंगल कांबळे आदी उपस्थित होते.

> महापालिकेकडून एकतर्फी व कायदा झुगारून कारवाई सुरू आहे. एकीकडे महापालिका सक्ती करून फॉर्म भरून दहा, वीस हजार रुपयांचे कर्ज देत आहे. मात्र त्यावर कारवाई करून जप्त करत आहेत असे करता येत नाही. मात्र असे केल्यास कर्ज कोण फेडणार ? शहराचा विकास साधताना केवळ श्रीमंतांचा विचार न करता सर्व घटकांचा विचार व्हावा. श्रीमंताच्या चार चाकी गाड्यांना जागा सन्मानाने दिली जाते. मात्र फेरीवाल्यांना टार्गेट केले जात आहे हे चुकीचे आहे.
> - काशिनाथ नखाते, कामगार नेते.

मोरवाडी चौकातील अहिल्याबाई होळकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून मोठ्या घोषणा देत शहरातील दापोडी, निगडी,आकुर्डी, पिंपरी, भोसरी,डांगे चौक, काळेवाडी, रहाटणी, घरकुल, चिखली, थरमॅक्स चौक ,रावेत वल्लभनगर ,अशा परिसरातील विक्रेत्यानी मोठ्या संख्येने सहभागी होऊन हातगाड्या घेऊन मोरवाडी चौक ते महापालिका भवन असा भव्य मोर्चा काढत सर्वांना परवाने द्या, सर्वांना स्थिर जागा द्या, अन्यकारक कारवाई त्वरित थांबवा अशा घोषणा देत महापालिका भावना समोर हा मोर्चा आला. महानगरपालिकेच्या गेटवर पूर्ण हातगाड्या लावून या मोर्चाचे सभेत रूपांतर झाले.

शिष्टमंडळाने विविध मागण्यांचे निवेदन अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे यांना दिले. यावर त्यांनी हॉकर झोन करता येईल अशा जागा सुचवव्यात, फेरीवालाबाबत सकारात्मक प्रस्ताव द्यावा, आयुक्त यांचेसोबत येत्या चार दिवसांमध्ये बैठक घेऊन कारवाई शिथिल करून फेरीवाल्यांचा प्रश्न योग्य रीतीने मार्गी लावण्यात येईल आश्वासन दिले.

---

# महापालिका जनसंवाद सभेत गाऱ्हाणी!

## प्रशासनाचे दुर्लक्ष : नागरिकांमधून व्यक्त होतोय संताप

।पिंपरी । । महाईन्यूज ।प्रतिनिधी।

पिंपरी: पाणीपुरवठा सुरळीतपणे करावा. पावसाळ्या आधी रस्त्यांवरील खड्डे बुजविण्याची कामे करण्यात यावी. पदपथांवर उभारण्यात आलेली अतिक्रमणे काढण्यात यावी, रस्त्यावरील अनधिकृत फळविक्रेते, हातगाड्या तसेच उभारण्यात आलेले अतिक्रमण काढावेत, अशा विविध मागण्या नागरिकांनी जनसंवाद सभेत केल्या.



पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने महापालिकेच्या संबंधित नागरिकांचे प्रश्न, तक्रारी सोडविण्याच्या दृष्टीने सर्व क्षेत्रीय कार्यालयात महिन्यातील दुस-या आणि चौथ्या सोमवारी जनसंवाद सभेचे आयोजन करण्यात येते. नागरिकांना महापालिकेच्या संबंधित असलेल्या तक्रारी आडचणी लवकरात लवकर सोडविण्याच्या अनुषंगाने जनसंवाद सभेचे आयोजन आयुक्त तथा प्रशासक यांच्या सुचनेनुसार करण्यात येते. महापालिकेच्या सर्व क्षेत्रीय कार्यालयांमध्ये आज पार पडलेल्या जनसंवाद सभेत नागरिकांनी सहभाग घेऊन एकूण 62 तक्रारवजा सूचना मांडल्या. (PCMC) यात अ, ब, क, ड, इ, फ, ग आणि ह क्षेत्रीय कार्यालयांमध्ये अनुक्रमे 13, 7, 4, 8, 2, 9, 9 आणि 10 तक्रारी वजा सूचना नागरिकांनी उपस्थित राहून मांडल्या.

### पावसाळ्यापूर्वीची कामे मार्गी लावा...

संभाव्य पावसाळा लक्षात घेऊन रस्त्यांची साफसफाई करण्यात यावी. पाणीपुरवठा सुरळीतपणे करावा. पावसाळ्याआधी रस्त्यांवरील खड्डे बुजविण्याची कामे करण्यात यावी. पदपथांवर उभारण्यात आलेली अतिक्रमणे काढण्यात यावी, रस्त्याच्या वरील अनधिकृत फळविक्रेते, हातगाड्या तसेच उभारण्यात आलेले अतिक्रमण काढावे, अतिक्रमणाबाबत कायम स्वरूपी उपाययोजना करण्यात याव्यात अशा सूचनांचा प्रामुख्याने समावेश होता.

मुख्य समन्वय अधिकारी असलेले अतिरिक्त आयुक्त उल्हास जगताप, सहशहर अभियंता श्रीकांत सवणे, संजय कुलकर्णी, प्रमोद ओंभासे, मनोज सेठिया, उपआयुक्त चंद्रकांत इंदलकर, अजय चारठाणकर यांनी भूषवले. क्षेत्रीय अधिकारी सुचिता पानसरे, अमित पंडित,उमाकांत गायकवाड, राजेश आगळे, सिताराम बहुरे, शितल वाकडे,सुषमा शिंदे, विजयकुमार थोरात उपस्थित होते.

# तंत्रज्ञान प्रगतीचे पुढील वळण धोकादायक




मानवाचे कष्ट कमी करून उत्पादन वाढविण्यासाठी यंत्राचा शोध लावला गेला. पुढे अनेक क्षेत्रांत यंत्रांनी मानवाची जागा घेतली. आता 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स' (कृत्रिम बुद्धिमत्ता - एआय) तंत्रज्ञानामुळे यंत्रे मानवापेक्षा वरचढ होण्याची शक्यता आहे. एखाद्या प्रक्रियेचे अध्ययन करून, त्यावरून स्वत:हून काम करणारी (मशिन लर्निंग) यंत्रे किंवा सर्जनशील संवाद लिहू शकणारे 'चॅट जीपीटी'सारखे तंत्रज्ञान हे आजचे वास्तव आहे. 'एआय' तंत्रज्ञानाने खरे तर मानवासमोर आव्हान निर्माण केले आहे. मात्र, त्याकडे मानवी बुद्धिमत्तेचे यश म्हणून पाहत, त्याचे अधिकाधिक बाजारीकरण करण्यावर बड्या कंपन्या भर देत आहेत आणि या तंत्रज्ञानावर आधारित उत्पादनांच्या निर्मितीची स्पर्धा तीव्र करीत आहेत. या पार्श्वभूमीवर, हे तंत्रज्ञान विकसित करणाऱ्या शास्त्रज्ञांमधील अग्रणीने त्याच्या विरोधात दिलेला इशारा महत्त्वाचा ठरतो. डॉ. जेफ्री हिंटन हे त्यांचे नाव. 'एआय' तंत्रज्ञानाचे 'गॉडफादर' म्हणून ओळखले जात असलेले हिंटन नुकतेच 'गूगल'मधून स्वत:हून पायउतार झाले आहेत. पाऊणशे वयोमान असलेले हिंटन आणि त्यांच्या दोन विद्यार्थ्यांनी 'एआय' तंत्रज्ञानाला पायाभूत ठरेल, असे संशोधन केले आहे. त्यांच्या संशोधनामुळे तब्बल साडेचार अब्ज डॉलर खर्चून 'गूगल'ने त्यांची कंपनी दशकभरापूर्वी विकत घेतली होती. त्यांनी 'गूगल'साठी 'एआय' तंत्रज्ञान विकसित करणे, हा हेतू अर्थातच त्यामागे होता. त्यांनी तसे केलेही; परंतु आज त्यांना या कामाबद्दल खंत वाटते. ती त्यांनी जाहीरपणे व्यक्त केली असून, या तंत्रज्ञानाच्या संभाव्य धोक्यांकडे लक्ष वेधले आहे.

कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञान मानवासाठी धोकादायक ठरू शकते, यामुळे चुकीच्या आणि खोट्या माहितीचा भडिमार होऊ शकतो, अनेकांना रोजगार गमवावा लागेल आणि मुख्य म्हणजे मानवी बुद्धिमत्तेसमोर अस्तित्वाचा प्रश्न निर्माण होईल, अशी भीती डॉ. हिंटन यांना वाटते; ती खोटी नाही. खऱ्या आणि खोट्या माहितीचे बेमालूम मिश्रण करून, ते डिजिटल माध्यमांद्वारे सर्वांपर्यंत पोहोचविण्याचे काम केव्हाच सुरू झाले आहे. हितसंबंधीय मंडळी स्वार्थासाठी असे करीत



असल्याची किती तरी उदाहरणे एव्हाना समोर आली आहेत. 'एआय' तंत्रज्ञानामुळे अशी चुकीची माहिती प्रसृत करणे अधिक सोपे होणार आहे. स्वत:च संदेश निर्माण करून, ते एकाच वेळी कोट्यवधी लोकांपर्यंत पोहोचवू शकणारी स्वयंचलित यंत्रणा या तंत्रज्ञानामुळे निर्माण होऊ शकते. त्याचा उपयोग हुकूमशाही वृत्तीचे नेते राजकीय हेतूंसाठी करू शकतात, याकडे डॉ. हिंटन यांनी अंगुलिनिर्देश केला आहे. एखाद्या गोष्टीतून मथितार्थ काढणे, गुंतागुंतीच्या प्रक्रियेतून नेमका निर्णय घेणे, सर्जनशीलतेने लेखन करणे वा संशोधन करणे यासाठी मानवी बुद्धिमत्ता फार महत्त्वाची ठरते. मात्र, ही कामे कृत्रिम बुद्धिमत्तेद्वारेही करता येऊ शकतात. यामुळे अनेक क्षेत्रांतील रोजगार मानवासाठी बंद होण्याचा धोका आहे. वैयक्तिक सहायकापासून विधी सल्लागारापर्यंतची अनेक कामे यंत्राद्वारे होऊ शकतात; त्यामुळे तिथे मानवाची गरज भासणार नाही, हे नमूद करून डॉ. हिंटन यांनी यामुळे मानवासमोर अस्तित्वाचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता वर्तविली आहे. 'हे तंत्रज्ञान विकसित करण्यात माझा वाटा आहे,' अशी खंत व्यक्त करतानाच, 'मी हे केले नसते तर आणखी कोणी केले असते,' अशी पुस्तीही ते जोडतात.

डॉ. हिंटन यांनी दाखवून दिलेला इशारा गांभीर्याने घ्यायला हवा. 'चॅट जीपीटी'चा आविष्कार झाला तेव्हापासून अनेक शास्त्रज्ञ, शिक्षणतज्ज्ञ आणि जाणकार याबद्दल इशारे देत आहेत. 'चॅट जीपीटी'चा शिक्षणात वापर होऊ शकतो; मात्र यामुळे विद्यार्थ्यांची अध्ययनाची प्रक्रियाच थांबू शकते, याकडे नोअम चोम्स्की यांच्यासारख्या बुद्धिमंताने लक्ष वेधले आहे. अनेक विद्यापीठांनी शिक्षणात या तंत्रज्ञानावर बंदी घातली असली, तरी या तंत्रज्ञानाचा नवा आविष्कार नुकताच आला आहे. या तंत्रज्ञानाचा गांभीर्याने फेरविचार व्हायला हवा, अशा आशयाचे पत्र अमेरिकेतील एक हजार तंत्रज्ञांनी अलीकडेच लिहिले आहे. हे सर्व जण या तंत्रज्ञानातील अग्रणी आहेत. मानवता आणि समाज यांच्यावर या तंत्रज्ञानाचा होणारा परिणाम अभ्यासणे गरजेचे आहे. ते न अभ्यासता कृत्रिम बुद्धिमत्ता विकसित करण्याची स्पर्धा कायम ठेवणे धोकादायक आहे. यंत्रनिर्मितीमागील प्रेरणा आणि कृत्रिम तंत्रज्ञानाच्या निर्मितीमागील प्रेरणा या आता भिन्न आहेत. मानवाचे परिश्रम कमी करण्यापेक्षा बाजारपेठेवर नियंत्रण मिळविण्याच्या ईर्ष्येतून ही स्थिती निर्माण झाली आहे. ती अशीच कायम राहिल्यास मानवासमोरील तंत्रज्ञान प्रगतीचे पुढील वळण धोकादायक ठरेल यात शंका नाही.

## संपादकीय »

### मणिपूरमधील उद्रेक

***भारताचा चालू आर्थिक वर्षीतील 'जीडीपी', म्हणजे एकूण देशांतर्गत उत्पादनातील वाढ साडेसहा टक्के तरी होईल का, ही या आढाव्यातली मुख्य शंका आहे.***

ईशान्येकडील छोटे राज्य असलेल्या मणिपूरमधील ताज्या दंगली तेथील कायदा आणि सुव्यवस्थेचे अपयश अधोरेखित करतात. एकूण लोकसंख्येत ५३ टक्के असलेल्या मैतेई समाजाला अनुसूचित जमातीतून (एसटी) आरक्षण देण्याच्या हालचाली, हे त्याचे तत्कालीक कारण असले, तरी नागा आणि कुकी या आदिवासी समाजात गेल्या अनेक दिवसांपासून असलेला असंतोष; त्याकडे राज्य सरकारने केलेले दुर्लक्ष, हे त्याचे मुख्य कारण. ९० टक्के डोंगराळ भाग आणि उर्वरित मैदानी प्रदेश अशी भौगोलिक विभागणी असलेल्या या राज्यात, मैदानी भागातील मैतेई समाजाचे वर्चस्व आहे. सत्तेवर कोणीही असले, तरी त्यामध्ये हाच समाजघटक अधिकांशाने असतो; त्यामुळे सरकारच्या निर्णयांकडे आदिवासी अनेकदा संशयाने पाहतात.

**महाराष्ट्रासहित देशातील दहा राज्यांमधील किमान १८० जिल्ह्यांना नक्षलवादाचा कमी-अधिक स्पर्श झाला होता. हा प्रभावित जिल्ह्यांचा आकडा गेल्या १५ वर्षांमध्ये घटून सत्तरवर आल्याचे सांगितले जाते. हे आधी डॉ. मनमोहनसिंग; तसेच नंतर मोदी सरकारचे मोठे यश आहे.**

## दुर्दैवी आणि भयंकर!



या सत्तरमधीलही दहा राज्यांमधील २५ जिल्हे 'सर्वाधिक नक्षलग्रस्त आणि त्रासदायक' उरले आहेत. ही घटती ताकदच 'ग्रामीण नक्षलवाद्यांना' अधिक आक्रमक बनवते आहे का, हा प्रश्न आहे.

दुसरीकडे, नक्षलवाद किंवा माओवादाच्या शहरी समर्थकांमध्ये काही ठिकाणी वाढ झाली आहे. त्यांना टिपणे व नंतर जेरबंद करणे, हे सोपे नाही. दंतेवाडात दहा जवान शहीद झाल्यानंतर, अनेक शहरी नक्षल गट व संस्थांमध्ये आनंद, उत्साह पसरला असेल. जंगली माओवाद्यांना नैतिक, आर्थिक व इतरही बळ देणाऱ्या सर्व शहरी गटांना नेस्तनाबूत करण्यात अद्याप यश आलेले नाही. यंदाच्या जानेवारीत छत्तीसगडमध्ये प्रचार सभांमध्ये बोलताना गृहमंत्री अमित शहा यांनी काँग्रेस राजवटीतील 'सरासरी नक्षल घटना' आता २५ टक्केही उरलेल्या नाहीत, असा दावा केला. तो बऱ्याच प्रमाणात योग्य आहे. मात्र, २०२४ च्या सार्वत्रिक निवडणुकांपूर्वी देश नक्षलवाद्यांच्या हिंसाचारापासून पूर्ण मुक्त झालेला असेल, असा दावा शहा यांनी केला होता. तो खरा ठरेल का, अशी शंका या ताज्या हिंस्र हल्ल्याने निर्माण केली आहे.

केंद्र आणि राज्य सरकारे, विविध प्रकारची संरक्षक दले आणि ग्रामपंचायतीपासून वरपर्यंतची नोकरशाही यांच्या अवाढव्य मनुष्यबळामध्ये नक्षलवाद्यांना प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष मदत करणारे किंवा पैशासाठी फितूर होणारे असे आता कुणीही उरलेले नाही, हा दावा या स्फोटाने निरर्थक ठरला. छोटासाही धक्का बसल्यानंतर मोठा स्फोट होण्याचे हे तंत्रज्ञान नक्षलवादी बराच काळ वापरत आहेत. दंतेवाडाचा हा स्फोट इतका शक्तिशाली होता, की रस्ता फाटलाच; शिवाय स्फोटाच्या जागी अनेक फूट खोल खड्डा पडला. वाहनाच्या चिंध्या झाल्या. असा स्फोट घडविण्यासाठी किमान ५० किलो शक्तिशाली स्फोटके वापरली गेली असतील, असा अंदाज आहे. याचा अर्थ, नक्षलवाद्यांची रसद तोडण्यात राज्य सरकारे; तसेच केंद्र सरकारच्या यंत्रणांना अद्याप पुरते यश आलेले दिसत नाही. नक्षल प्रभाव असणाऱ्या भागात प्रचंड मोठ्या कोळशाच्या खाणी आहेत. या खाणींमध्येही स्फोटके लागतात. हीच स्फोटके चोरून नक्षलवादी बॉम्ब बनवितात, की त्यांना नेपाळ वा इतर मार्गांनी पाकिस्तान किंवा इतर देशांमधून शस्त्रे व स्फोटके येतात, ही शंका आहे. ही पुरवठा साखळी अद्याप पुरती उद्ध्वस्त झालेली नाही.

## ।। अभंगवाणी ।।



अइकाल परी ऐसें नव्हे बाई ।
न संडा या सोई भ्रताराची ॥१॥
नव्हे आराणुक लौकिकापासून ।
आपुल्या आपण गोविलें तें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# ...तर 16 आमदार अपात्र ठरतील!

## सुप्रीम कोर्टाच्या निर्णयाआधी विधानसभा उपाध्यक्षांचं मोठं विधान!

।मुंबई । महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**महाराष्ट्राच्या सत्तासंघर्षावरील सुनावणी पूर्ण झाल्यानंतर सर्वोच्च न्यायालयाने आपला निर्णय राखून ठेवला आहे. चालू आठवड्यात सर्वोच्च न्यायालय यावर निर्णय देण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाआधी विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवळ यांनी मोठं विधान केलं आहे. १६ आमदारांच्या अपात्रतेचं प्रकरण माझ्याकडे आलं तर ते सर्वजण अपात्र ठरतील, असं विधान झिरवळ यांनी केलं आहे. त्यामुळे राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आलं आहे.**



प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना नरहरी झिरवळ म्हणाले, "सत्तासंघर्षाचा निकाल काय येईल आणि कसा येईल? हे कोण ठरवू शकतो? शेवटी सर्वोच्च न्यायालय हे सर्वोच्च न्यायालय आहे. सत्तासंघर्षाचं प्रकरण पूर्णपणे माझ्याशी निगडीत आहे, असं तुम्ही आम्ही म्हणतो. मलाही वाटतं की ते प्रकरण माझ्याकडे येईल. पण ते प्रकरण माझ्याकडेच येईल, हे कोण पक्कं सांगू शकत नाही. यावर न्यायालय निर्णय घेईल."

१६ आमदारांचं प्रकरण तुमच्याकडे आलं तर काय होईल? असं विचारलं असता नरहरी झिरवळ म्हणाले, "ते प्रकरण माझ्याकडे येऊ दे तरी, आल्यावर पाहू काय करायचं, आता मी इथून १६ आमदारांना अपात्र म्हणून पाठवलं, तर ते अपात्र होतील."

### घटनेला धरून निर्णय

झिरवळ यांनी पुढे सांगितलं, "माझ्या निर्णयाच्या विरोधात निकाल लागला किंवा माझ्यावर शंका घेतली तर मी चुकीचा निर्णय दिलाय, असं सिद्ध होईल. पण मी घटनेला धरून निर्णय दिलाय... घटनेचा अभ्यास करून १६ आमदारांना अपात्र ठरवलंय. त्यामुळे मी चुकीचा ठरलो तर घटनाच चुकली, असं म्हणता येईल का? म्हणून मी दिलेला निर्णय बरोबरच आहे."

---

# समृद्धी महामार्गाबाबत आरटीओचा मोठा निर्णय!

## रिफ्लेक्टर नसलेल्या वाहनांना बंदी, तपासणीही सुरू

।नागपूर । महाईन्यूज ।प्रतिनिधी।



**हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्गावर अपघातांचे चक्र सुरूच आहे. नागपूर ते शिर्डी दरम्यानच्या महामार्गावर दररोज अपघाताच्या घटना समोर येत आहेत. मात्र, हे अपघात रोखण्यासाठी आरटीओकडून सातत्याने उपाययोजना केल्या जात आहेत. या पार्श्वभूमीवर सोमवारी मोठा निर्णय घेत आरटीओने रिफ्लेक्टर नसलेल्या वाहनांची तपासणी सुरू केली आहे. यावेळी रिफ्लेक्टर नसलेल्या वाहनांना प्रत्येकी एक हजाराचा दंडही ठोठावण्यात आला.?**

रस्ते वाहतूक सुरक्षेच्या दृष्टिकोनातून माल वाहतूक करणाऱ्या वाहनांवर रेडियम किंवा पेंट असलेले रिफ्लेक्टर बसवणे बंधनकारक आहे. या रिफ्लेक्टरमुळे मागून येणारे वाहन पुढील वाहन स्पष्टपणे पाहू शकते, त्यामुळे अपघात कमी होण्यास मदत होते. सोमवारी नागपूर ग्रामीण आरटीओ कार्यालयात रिफ्लेक्टिव्ह पेंट लावून समृद्धीमध्ये तैनात आरटीओच्या एअर व्हेलॉसिटी टीमने सकाळपासून दुपारी दीड वाजेपर्यंत रिफ्लेक्टरशिवाय सुमारे २० वाहने थांबवली.

### त्यात सुधारणा न झाल्यास बंदी घालण्यात येईल

**नागपूर ग्रामीण प्रादेशिक परिवहन अधिकारी विजय चव्हाण यांनी सांगितले की, धडक कारवाई सध्या हलकी असली तरी दोन दिवसांनंतर या महामार्गावर टायरसारख्या रिफ्लेक्टर नसलेल्या वाहनांना प्रवास करण्यास बंदी घालण्यात येणार आहे. यावेळी ते म्हणाले की, पहिल्यांदाच आरटीओकडून वाहनांना रिफ्लेक्टर पेंट लावले जात आहे.**

---

# सबसे कातिल, गौतमी पाटील!

## कार्यक्रम सुरू झाला, तुफान गर्दी, तरुण उभे असलेले पत्र्याचे छत कोसळले!



।पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

छत्रपती संभाजीनगरमधील महालगाव येथे आयोजित नर्तकी गौतमी पाटील हिच्या कार्यक्रमात तरुण उभे असलेले पत्र्याते छत कोसळले. यात कोणालाही गंभीर दुखापत झाली नाही.

छत्रपती संभाजीनगर: प्रसिद्ध नृत्यांगणा गौतमी पाटील हिच्या कार्यक्रमादरम्यान चर्चा होईल असे काही ना काही घडत असते. वैजापूर तालुक्यातील महालगाव येथील गौतमीच्या कार्यक्रमात असाच काहीसा धक्कादायक प्रकार घडला. येथील कार्यक्रमात गौतमी पाटील मंचावर नृत्य सादर करत असताना समोर तुफान गर्दी जमली होती. तुडुंब गर्दी झाल्याने काही तरुण दुकानाच्या पत्र्याच्या छतावर बसले होते. कार्यक्रम रंगात आला असताना छतावर वजन जास्त झाल्याने हे शेड खाली कोसळलं. सुदैवाने यात कोणाला गंभीर दुखापत झालेली नाही. हा व्हिडिओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे.

नर्तकी गौतमी पाटील हिचा ८ मे रोजी वैजापूर येथील महालगाव येथे नृत्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.


# कर्नाटकमध्ये उद्या मतदान!

## प्रचार समाप्त ; चुरशीची तिरंगी लढत

।बंगळूरु। महाईन्यूज ।

**विलक्षण चुरशीने लढल्या जात असलेल्या कर्नाटक विधानसभा निवडणुकीचा प्रचार सोमवारी संपला. राज्यातील २२४ जागांसाठी बुधवार दि. १० रोजी मतदान होत आहे. सत्तारूढ भाजपविरोधात काँग्रेस अशी येथे झुंज आहे. काही ठिकाणी धर्मनिरपेक्ष जनता दलाचीही ताकद आहे. गेले पंधरा दिवस देशभरातील प्रमुख नेते कर्नाटकमध्ये तळ ठोकून होते. वैयक्तिक आरोप-प्रत्यारोप मोठ्या प्रमाणात करण्यात आले. भाजपची सारी भिस्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या करिष्म्यावर आहे. दक्षिणेतील हे महत्त्वाचे राज्य पुन्हा जिंकून भाजप ३८ वर्षांचा इतिहास मोडणार का? ही उत्सुकता आहे. तर २०२४ च्या लोकसभा निवडणुकीच्या दृष्टीने काँग्रेसला कर्नाटक जिंकणे महत्त्वाचे आहे. येथे सत्ता आल्यास काँग्रेसचे महत्त्व वाढणार आहे. माजी पंतप्रधान एच.डी.देवेगौडा यांच्या धर्मनिरपेक्ष जनता दलाने सत्तेसाठी सारी ताकद लावली आहे.**






स्थिर सरकारची घोषणा सर्वच पक्षांनी दिली आहे. भाजपकडून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केंद्र तसेच राज्यात एकाच पक्षाचे सरकार असल्यास विकास होईल यावर भर दिला. पंतप्रधानांनी १९ मोठ्या सभा तसेच सहा रोड शो केले. निवडणूक जाहीर झाल्यापासून म्हणजेच २९ मार्चपासून सात वेळा पंतप्रधानांनी राज्याचा दौरा केला. भाजपच्या राष्ट्रीय नेत्यांनी २०६ सभा तसेच ९० रोड शो केले. काँग्रेसचा प्रचार प्रामुख्याने राज्यातील नेत्यांनी केला. पक्षाध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी अनेक सभा घेतल्या. राहुल गांधी तसेच प्रियंका गांधी यांनीही मोठ्या प्रमाणात प्रचारात सहभाग घेतला.



### 375 कोटींचा मुद्देमाल जप्त

विधानसभा निवडणूक जाहीर झाल्यानंतर २९ मार्चला आदर्श आचारसंहिता लागू झाल्यापासून कर्नाटकमध्ये आतापर्यंत ३७५ कोटींपेक्षा जास्त किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. निवडणूक आयोगाने यासंबंधी माहिती दिली. यामध्ये १४७ कोटींची रक्कम, ८४ कोटींचे मद्य, ९७ कोटींचे सोने आणि चांदी, २४ कोटींच्या भेटवस्तूंचे वाटप आणि २४ कोटींचे अमली पदार्थ यांचा समावेश आहे.

### राहुल यांचा बसमधून प्रवास

प्रचाराच्या अखेरच्या दिवशी काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी येथे शहर बसमधून प्रवास केला. यावेळी त्यांनी बस थांब्यावर महाविद्यालयीन विद्यार्थिनींशी चर्चा केली.\

बसमधील प्रवाशांबरोबरही संवाद साधला. या विद्यार्थिनींचे आणि नोकरदार महिलांची स्वत:च्या राज्याबद्दल काय स्वप्ने आहेत, दृष्टिकोन आहे ते राहुल यांनी जाणून घेतले असे काँग्रेसच्या नेत्यांनी सांगितले. या महिलांनी महागाई, गृहिणींसाठीची 'गृहलक्ष्मी' योजना आणि महिलांना बसमधून मोफत प्रवासाची काँग्रेसची योजना याबद्दल मत व्यक्त केल्याचे सांगण्यात आले.

### एकनाथ शिंदे यांचा उडुपी, मंगळूरुत प्रचार

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उडुपी आणि मंगळूरुत भाजपच्या उमेदवारांसाठी रोड शो आणि सभांच्या माध्यमातून त्याचबरोबर समाजातील विविध स्तरांतील मान्यवरांशी संवाद साधून सोमवारी प्रचार केला. शिंदे यांचे मंगळूरु विमानतळावर कर्नाटकी पद्धतीने वाद्यवादन आणि पुष्पहार घालून जल्लोषात स्वागत करण्यात आले. मंगळूरुत वेगवेगळ्या क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या नागरिकांसाठी विशेष स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी शिंदे यांनी त्यांच्याशी संवाद साधला. कर्नाटकातील अनेक नागरिक हे महाराष्ट्राशी जोडले गेले आहेत. त्यामध्ये डॉक्टर, वकील, विकासक, हॉटेल व्यावसायिक, उद्योजक आदींचा समावेश असून शिंदे यांनी त्यांच्याशी मनमोकळी चर्चा केली आणि महाराष्ट्राशी असलेले नाते अधिक वृध्दिंगत व्हावे, असे आवाहन केले. त्यासाठी राज्य शासन सर्व सहकार्य करायला तयार असल्याचे शिंदे यांनी स्पष्ट केले. 'श्री छत्रपती शिवाजी महाराज मराठा असोसिएशनद्वतर्फे मंगलोर येथे सभेचेही आयोजन करण्यात आले होते. शिंदे यांनी धर्मस्थळ येथील श्री मंजुनाथ मंदिराला भेट देऊन दर्शन घेतले. उडुपी येथेही शिंदे यांनी रोड शोच्या माध्यमातून आणि सभा घेऊन भाजप उमेदवार हरीश पुंजा यांचा प्रचार केला.

## पेट्रोल पंपावर नशीब चमकलं, बाहेर पडताच महिला कोट्यधीश

।नॉर्थ कॅरोलिना । महाईन्यूज ।

कोणाचं नशीब कसं बदलेल आणि कधी त्यांच्या आयुष्यात लक्ष्मीची कृपा होईल हे सांगता येत नाही. अनेकदा तर व्यक्तीच्या ज्ञानीमनी नसतानाही तो असं काही करतो की क्षणात श्रीमंत होतो. असंच काहीसं या महिलेसोबत घडलं आहे. जिने काहीही विचार न करता सहज म्हणून लॉटरीचं खरेदी केलं आणि त्यानेच तिला कोट्यधीश बनवलं. जेव्हाकी तिचा लॉटरीचं तिकीट खरेदी करण्याचा कुठलाही विचार नव्हता.

मीडिया रिपोर्ट्सनुसार, हे प्रकरण काहीसे जुने आहे. पण, ते नुकतेच चर्चेत आले आहे. ही महिला ट्रक ड्रायव्हर एका झटक्यात कोट्यधीश झाली. पेट्रोल पंपावर ट्रकमध्ये इंधन भरत असताना हा सर्व प्रकार घडला. अमेरिकेतील नॉर्थ कॅरोलिना येथे राहणारी लॉरा कीन काही महिन्यांपूर्वी खरेदीसाठी ट्रक घेऊन बाहेर पडली होती आणि यावेळी तिचा जोडीदारही तिच्यासोबत होता. मात्र, त्यांच्या ट्रकमधील इंधन संपलं होतं. त्यामुळे ते पेट्रोल पंपावर गेले होते. तिथे तिला कळालं की येथे लॉटरीचे तिकिटही विकले जात आहेत.

त्यामुळे तिने सहज म्हणून लॉटरीचे तिकिट खरेदी केले. त्यानंतर त्यांनी ट्रकमध्ये इंधन भरलं आणि ते पुढे निघाले. काहीच वेळात लॉराचं नशीब चमकलं होतं. तिला सांगण्यात आलं की जे तिकिट तिने त्या पेट्रोल पंपावर खरेदी केलं त्यावर तिला जॅकपॉट लागला आहे. ती काहीच क्षणात कोट्यधीश झाली होती. तिला ८ कोटींची लॉटरी लागली होती. ती तिच्या ट्रकमध्ये इंधन भरण्यासाठी नॉर्थ कॅरोलिनामधील कर्नर्सविले येथील सेव्हन इलेव्हन गॅस स्टेशनवर थांबले होते, अशी माहिती आहे. लॉराला तिच्या नशिबावर विश्वास बसत नव्हता. तिची कहाणी व्हायरल होताच लोकांनी त्या पेट्रोल पंपाचा शोध सुरू केला.

## समुद्राच्या तळाशी सापडलं हॉस्पिटल, शेजारीच आढळली कबर!

### तब्बल 150 वर्षांपूर्वी एक संपूर्ण बेट पाण्याखाली बुडालं

।फ्लोरिडा। महाईन्यूज ।

**समुद्राच्या पोटात अनेक रहस्यं दडलेली आहेत. संशोधकांना अनेक गोष्टी सापडत असतात. जगातील अनेक संस्कृती पाण्याखाली गेल्या. भारतात संपूर्ण द्वारका पाण्याखाली गेली. जगात अशी अनेक उदाहरणं आहेत. पुरातत्त्वशास्त्रज्ञांना फ्लोरिडात समुद्राच्या तळाशी रुग्णालय आणि कब्रस्तान सापडलं आहे. या सगळ्या वास्तू यलो फिव्हर बाधित रुग्णांशी संबंधित असू शकतात, असा अंदाज पुरातत्त्वशास्त्रज्ञांनी वर्तवला आहे..**



पाणबुड्यांना समुद्राच्या खाली एक कबर सापडली आहे. या कबरीच्या शेजारी एक रुग्णालय आढळून आलं आहे. फ्लोरिडाच्या ड्राय टोर्टुगास राष्ट्रीय उद्यानाच्या शेजारी या वास्तू आढळून आल्या. लहानशा बेटावर यलो फिव्हर बाधितांना विलगीकरणात ठेवण्यात येत होतं. काळाच्या ओघात ही जागा पाण्याखाली गेली. त्यामुळे रुग्णालय आणि कब्रस्तान समुद्राच्या पोटात सामावलं, अशी शक्यता पुरातत्त्वशास्त्रज्ञांनी बोलून दाखवली.

पुरातत्त्वशास्त्रज्ञांना आतापर्यंत केवळ एकच कबर सापडली आहे. मात्र याच भागात आणखी काही कबरी सापडू शकतात असं शास्त्रज्ञांनी सांगितलं. १८६० ते ७० च्या कालावधीत यलो फिव्हरचा फैलाव वाढला होता. फिव्हरची लागण झालेल्या रुग्णांना याच बेटावर उपचारांसाठी दाखल करण्यात यायचं. मात्र रुग्णालयासोबत सगळंच पाण्याखाली गेलं.

# दृश्यम २’ नंतर अजय देवगणच्या ‘सिंघम अगेन’ची चर्चा

बॉलिवूड अभिनेता अजय देवगण मुख्य भूमिकेत असलेला ‘दृश्यम २’ हा चित्रपट १८ नोव्हेंबरला प्रदर्शित झाला. उत्कंठावर्धक कथा, कलाकारांचा दमदार अभिनय, क्लायमेक्स व एकामागोमाग येणारे ट्विस्ट या सगळ्यामुळे हा चित्रपट प्रेक्षकांच्या पसंतीस उतरला. ‘दृश्यम २’ला प्रेक्षकांकडून भरभरुन प्रेम मिळत आहे. हा चित्रपट पाहण्यासाठी प्रेक्षक चित्रपटगृहात गर्दी करत आहेत. ‘दृश्यम २’ची बॉक्स ऑफिसवर यशस्वी घौडदोड सुरू असतानाच आता अजय देवगणच्या ‘सिंघम’ चित्रपटाच्या सिक्वेलसाठी चाहते उत्सुक आहेत. ‘सिंघम’चा सिक्वेलही लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार असल्याच्या चर्चा रंगल्या आहेत. सिनेअभ्यासक तरण आदर्श यांनी त्यांच्या सोशल मीडिया अकाऊंटवरुन याबाबत माहिती दिली आहे. अजय देवगणचा फोटो पोस्ट करत ‘सिंघम’ चित्रपटाचा सिक्वेल येणार असल्याचं ते म्हणाले आहेत. अजय देवगण व रोहित शेट्टी सिंघम चित्रपटाच्या सिक्वेलसाठी पुन्हा एकत्र येणार आहेत. अजय देवगण-रोहित शेट्टी यांची यशस्वी जोडी पुन्हा एकत्र येणार आहे. सध्या अजय देवगण भोला चित्रपटाच्या प्रमोशनमध्ये व्यग्र आहे. त्यानंतर आम्ही सिंघमच्या सिक्वेलवर काम सुरू करणार असल्याचं रोहित शेट्टीने सांगितलं आहे”, असं तरण आदर्श यांनी त्यांच्या पोस्टमध्ये म्हटलं आहे.

‘सिंघम’ चित्रपटाच्या पुढील भागाचं नाव ‘सिंघम अगेन’ असं असणार आहे. २०११ साली ‘सिंघम’ हा चित्रपट प्रदर्शित झाला होती. त्यानंतर २०१४ साली या चित्रपटाचा दुसरा भाग ‘सिंघम रिटर्न्स’ प्रेक्षकांच्या भेटीला आला होता. आता या चित्रपटाचा तिसऱ्या




# प्रेम ठरवून करता येत नाही.. - स्वप्नील जोशी

मराठीतील एक दिग्गज आणि लोकप्रिय अभिनेता म्हणून ख्याती असलेला अभिनेता स्वप्नील जोशी, सध्या बराच चर्चेत आहे. मध्यंतरी केलेली पायी वारी असो, 'चला हवा येऊ द्या' मध्ये विशेष भूमिका असो किंवा 'तू तेव्हा तशी' या मालिकेतील सौरभ पटवर्धन. स्वप्नील हा कायमच प्रेक्षकांना भावाला आहे. विशेष म्हणजे यशाच्या इतक्या मोठ्या शिखरावर असूनही तो सर्वांशी आपुलकीने वागताना दिसतो. आज त्याने त्याच्या वैयक्तिक आयुष्याविषयी काही खुलासे केले आहेत.

मराठी चित्रपटसृष्टीतला चॉकलेट बॉय अशी ओळख असलेल्या अभिनेता स्वप्नील जोशी याने लहानपणापासून अभिनय क्षेत्रात काम केले आहे. आजवर त्याने अनेक चित्रपट, मालिकांमध्ये काम केलं आहे. प्रत्येक भूमिकेने त्याला एक वेगळी ओळख दिली आहे आणि प्रत्येक भूमिकेतून त्यातून तो काही तरी शिकत आला आहे, याच विषयी तो एका मुलाखतीत बोलला आहे. नुकतीच त्याने ही मुलाखत सोशल मिडियावर शेयर केली आहे.

स्वप्नीलने अभिनयाची सुरुवात वयाच्या नवव्या वर्षी केली. त्याने रामानंद सागर यांच्या ‘उत्तर रामायण’ या टीव्ही मालिकेत रामपुत्र कुशची भूमिका साकारली होती. तिथूनच त्याच्या अभिनयाच्या करिअरची सुरुवात झाली. त्यानंतर त्याने रामानंद सागर यांच्याच ‘श्रीकृष्ण’ या हिंदी मालिकेमध्ये भगवान श्रीकृष्णाची भूमिका केली होती. स्वप्नीलच्या या दोन्ही भूमिका चांगल्या गाजल्या होत्या. त्याशिवाय एका लग्नाची दुसरी गोष्ट, मुंबई पुणे मुंबई, मितवा, तु ही रे अशी न संपणारी लिस्ट आहे. २०१३ साली संजय जाधव दिग्दर्शित 'दुनियादारी' या चित्रपटाला प्रेक्षकांनी अक्षरशः डोक्यावर घेतलं. या चित्रपटातील स्वप्नीलच्या अभिनयाने लोकांचा मनात कायमचं घर केलं आहे.

एका मुलाखतीत अमृता खानविलकरने स्वप्नीला त्याच्या वेग वेगळ्या भूमिकेतून तो काय शिकला हा प्रश्न विचारला, स्वप्नीलने मस्त उत्तर दिले, " एका लग्नाची दुसरी गोष्ट मधल्या घणाने मला साधेपणा शिकवला, दुनियादारीतल्या श्रेयस ने मैत्री.. दुनियादरी शिकवली. मुंबई पुणे मुंबई मधल्या गौतमने 'प्रेम म्हणजे काय? प्रेम हे सांगून होत नाही.. आणि प्रेम हे ठरवून करता येत नाही' ही शिकवलं आणि सर्वात महत्वाचं मी श्री कृष्णाच्या



# विक्रम गोखले यांचा शेवटचा चित्रपट 'सूर लागू दे' लवकरच प्रदर्शित..

मराठी रंगभूमी आणि चित्रपटसृष्टीवर मागील पाच दशकांहून अधिक काळ अधिराज्य गाजवणारे ज्येष्ठ अभिनेते विक्रम गोखले (VIKRAM GOKHALE) यांचे शनिवारी 26 ऑक्टोबर रोजी निधन झाले. वयाच्या 77 वर्षी त्यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाने मनोरंजन विश्व शोकाकुल झालेले असतानाच एक दिलासा देणारी बातमी समोर आली. आपल्याला गोखले काकांना पडद्यावर पाहता येणार आहे. त्यांचा 'सूर लागू दे' हा शेवटचा चित्रपट लवकरच प्रदर्शित होणार आहे.



कलाकार आपल्यातून गेला तरी त्याने केलेलं काम हे कायम अजरामर राहत असतं. त्यांच्या कलाकृतीतून ते आपल्याला भेटत असतात. विक्रम गोखले आज आपल्यात नसले तरी ते कलाकृतींमधून आपल्यासोबत राहणार आहेत. लवकरच त्यांचा शेवटचा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. 'सूर लागू दे' (SUR LAGU DE) असे या चित्रपटाचे नाव असून नुकतंच या चित्रपटाचं पहिलं पोस्टर रिलीज करण्यात आलं आहे. 'सूर लागू दे' या चित्रपटाचे कथानक काहीसे वेगळ्या धाटणीचे आहे असून शीर्षकातच संगीताचा ताल दडलेला आहे. या चित्रपटात राष्ट्रीय पुरस्कार विजेते विक्रम गोखले आणि सुहासिनी मुळये हे दोन दिग्गज कलाकार मुख्य भूमिकेत आहेत. तर सुप्रसिद्ध मराठी टीव्ही अभिनेत्री रीना अगरवालही महत्त्वपूर्ण भूमिकेत आहे.

# सातासमुद्रापार गेलेली अभिनेत्री लेकाच्या आठवणींत व्याकुळ

सोनी मराठीवरून प्रसारित होणाऱ्या 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' कार्यक्रम घराघरात लोकप्रिय झाला आहे. या कार्यक्रमातील प्रत्येक कलाकारावर प्रेक्षकही भरभरून प्रेम करतात. याच कार्यक्रमानं अभिनेत्री नम्रता संभेराव हिला देखील उदंड लोकप्रियता मिळाली आहे. अचूक विनोद, सहजसुंदर अभिनय यामुळे नम्रतानं प्रेक्षकांच्या मनात स्वतःचं असं स्थान निर्माण केलं आहे. नम्रता सध्या कुर्रर्र नाटकाच्या निमित्तानं अमेरिकेला गेली आहे. तिथं त्यांच्या नाटकांचे विविध ठिकाणी प्रयोग होत आहेत.

कुर्रर्र नाटकामध्ये नम्रता हिच्याबरोबरच विशाखा सुभेदार, प्रसाद खांडेकर, पंढरीनाथ कांबळे हे कलाकार देखील आहेत. नाटकाच्या निमित्तानं नम्रता तिच्या लेकापासून रुद्राजपासून अनेक दिवस दूर आहे. त्यामुळे



तिला रुद्राजची खूप आठवण येत आहे. लेकाच्या आठवणी मनात दाटून आल्यानंतर भावुक झालेल्या नम्रतानं त्याचा एक अतिशय गोड व्हिडिओ सोशल मीडियावर शेअर केला आहे.

## नम्रता संभेरावची पोस्ट

नम्रतानं तिच्या इन्स्टाग्रामवरून रुद्राज याचा जो व्हिडिओ शेअर केला आहे त्यात तो 'एकटी एकटी घाबरलीस ना...' गाणं तालासुरात गाताना दिसत आहे. त्याच्या चेहऱ्यावर निरागस भाव ही स्पष्ट दिसत आहेत. रुद्राजचा व्हिडीओ शेअर करताना नम्रता म्हणाली, 'एकटी एकटी घाबरलीस ना वाटलंच होत आई, म्हणूनच तर सोडून तुला लांब गेलो नाही...' हे गाणं जेव्हा जेव्हा ऐकते तेव्हा तेव्हा डोळे पाणवतात. लवकरच परत येतेय. कधी एकदा तुला घट्ट मिठी मारते असं झालंय. कारण मी खरंच शूर नाही हे मी इतकं लांब आल्यावर माझ्या लक्षात आलं...' नम्रतानं पोस्टमध्ये पुढं लिहिलं आहे की,' कारण क्षणोक्षणी तुझी आठवण आली. पण आता मला खात्री आहे माझा सगळा भित्रेपणा छूमंतर होणार. कारण लवकरच मी माझ्या शूर बाळाला भेटणार आहे...' नम्रतानं शेअर केलेल्या या व्हिडिओवर तिचे चाहते भरभरून कॉमेन्ट करत आहेत. याशिवाय ऋतुजा बागवे,अभिजीत खांडकेकर यांनी देखील प्रतिक्रिया व्यक्त केल्या आहेत.

# मुंबई, आरसीबीला सामन्यापूर्वीच धक्का!

## आयपीएल 2023 : KKR च्या विजयाने गुणतालिकेचे समीकरण फिरले

। कोलकाता ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**मुंबई इंडियन्स आणि आरसीबी यांच्यात मंगळवारी सामना रंगणार आहे. पण हा सामना सुरु होण्यापूर्वीच दोन्ही संघांना आता एक मोठा धक्का बसला आहे. कारण केकेआरच्या विजयानंतर गुणतालिकेचं समीकरण पूर्णपणे बदलून गेलं आहे.**



केकेआरचा संघ या सामन्यापूर्वी आठव्या स्थानावर होता. केकेआरने यापूर्वी चार सामने जिंकले होते त्यामुळे त्यांचे आठ गुण होते. केकेआरने हा सामना जिंकला आणि त्यांना दोन गुण मिळाले. त्यामुळे केकेआरचे आता १० गुण झाले आहेत. सध्याच्या घडीला गुणतालिकेत १० गुणांसह केकेआरच्या संघाने आता पाचवे स्थान पटकावले आहे. केकेआर आणि मुंबई व आरसीबी यांचे सध्याच्या घडीला समान असे १० गुणच आहेत. पण तरीही केकेआरने मुंबई आरसीबीला मागे टाकले आहे. कारण केकेआरचा रन रेट हा -०.०७ असा आहे. दुसरीकडे आरसीबी आणि मुंबई इंडियन्स यांचा रनरेट हा अनुक्रमे -०.२०९ व -०.४५४ असा आहे. त्यामुळे तिन्ही संघांचे गुण समान असले तरी केकेआरच्या संघाने मुंबई आरसीबी या दोन्ही संघांना धक्के दिले आहेत. आता मंगळवारी या दोन्ही संघांमध्ये सामना होणार आहे. त्यामुळे मुंबई किंवा आरसीबी यांच्यामधील एक संघ या सामन्यात नक्कीच जिंकेल. जो संघ जिंकेल तो १२ गुणांसह पुढे निघून जाईल. पण जो संघ पराभूत होईल त्या संघावर आयपीएलमधून बाहेर पडण्याची वेळ येऊ शकते. कारण त्यानंतर पराभूत संघाचे फक्त तीन सामने असतील आणि त्यामुळे त्यांच्या प्ले ऑफच्या आशा मावळलेल्या असतील. त्यामुळे मुंबई इंडियन्स आणि आरसीबी यांच्यातील सामना हा सर्वात महत्वाचा समजला जात आहे. त्यामुळे मंगळवारी कोणता संघ बाजी मारतो, याकडे सर्वांचे लक्ष लागलेले असणार आहे. मुंबई इंडियन्स आणि आरसीबी या दोन्ही संघांचे सध्या समान १० गुण आहेत. त्याचबरोबर दोन्ही संघांचे आता चार सामने उरले आहेत. त्यामुळे या चार सामन्यांमध्ये हे दोन्ही संघ किती विजय मिळवतात याकडे सर्वांचे लक्ष लागलेले असेल.

### आंद्रे रसेलच्या चुकीनंतरही कोलकाताने सामना जिंकला



रिंकू सिंगने अखेरच्या चेंडूवर चौकार मारत केकेआरला थरारत विजय मिळवून दिला. त्यापूर्वी आंद्रे रसेलने ४२ धावांची धडकेबाज खेळी साकारत संघाला विजयासमीप पोहोचवले होते. पण १९.५ व्या चेंडूवर तो धावचीत झाला आणि त्यानंतर अखेरच्या चेंडूवर रिंकूने चौकार लगावत संघाला विजय मिळवून दिला. शिखर धवनच्या अर्धशतकाच्या जोरावर पंजाब किंग्सने केकेआरपुढे १८० धावांचे आव्हान ठेवले होते. या आव्हानाचा पाठलाग करताना केकेआरच्या कर्णधार नितिश राणाने अर्धशतक झळकावले.

पंजाबच्या १८० धावांचा पाठलाग करायला केकेआरचा संघ मैदानात उतरला खरा, पण त्यांची सुरुवात आश्वासक झाली नाही. कारण पाचव्या षटकात केकेआरचा गुरबाझ १५ धावांवर बाद झाला. त्यानंतर काही काळ जेसन रॉय आणि कर्णधार नितिश राणा यांची दमदार भागीदारी झाली. पण रॉय ३८ धावांवर बाद झाला आणि केकेआरला दुसरा धक्का बसला. त्यानंतर फलंदाजीला आलेला वेंकटेश अय्यर ११ धावांवर बाद झाला. केकेआरचे फलंदाज एकामागून एक बाद होत होते, पण तरीही राणा हा खेळपट्टीवर टिकाव धरून होता. राणाने यावेळी अर्धशतक झळकावले आणि त्यानंतरच्या चेंडूवर तो बाद झाला. राणाने यावेळी ३१ चेंडूंत ५८ धावा केल्या.

पंजाबचा संघ प्रथम फलंदाजी करण्यासाठी मैदानात उतरला. पण पंजाबच्या संघाची सुरुवात यावेळी चांगली झाली नाही. पंजाबच्या संघाला यावेळी पहिल्या चार षटकांतच दोन धक्के बसले. त्यामुळे त्यांची चार षटकांत २ बाद २९ अशी अवस्था झाली होती. पण सलामीवीर शिखर धवन मात्र खेळपट्टीवर ठाण मांडून बसला होता. पंजाबला एकामागून एक धक्के बसत होते. पण तरीही धवन डगमगला नाही. धवनने यावेळी दमदार फटकेबाजी करत आपले अर्धशतक झळकावले आणि संघाच्या धावसंख्येला चांगला आकार दिला. धवनने यावेळी ४७ चेंडूंत ९ चौकार आणि एका षटकाराच्या जोरावर ५७ धावांची खेळी साकारली.

---

# मराठी पोराचा अमेरिकेत डंका!

## महाराष्ट्राच्या अविनाश साबळेचा राष्ट्रीय विक्रम

। नवी दिल्ली ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**महाराष्ट्राच्या अविनाश साबळेने अमेरिकेतील पुरुषांच्या पाच हजार मीटर धावण्याच्या शर्यतीत नवा राष्ट्रीय विक्रम नोंदविला. त्याने स्वतःचाच विक्रम मोडीत काढला. या शर्यतीत त्याने १३ मिनिटे १९.३० सेकंद वेळ नोंदवली. याआधीची त्याची वेळ १३ मिनिटे २५.६५ सेकंद होती. अर्थात, या शर्यतीत तो बाराव्या क्रमांकावर राहिला**



लॉस एंजलिस येथे झालेल्या साउंड रनिंग ट्रॅक फेस्टिव्हलमध्ये शनिवारी साबळेने आपली कामगिरी उंचावली. तीन हजार मीटर स्टीपलचेसमधील राष्ट्रीय विक्रम साबळेच्या नावावर आहे. स्टीपलचेस ही त्याची मुख्य शर्यत आहे. गेल्या वर्षीच्या राष्ट्रकुलमध्ये त्याने तीन हजार मीटर स्टीपलचेसमध्ये रौप्यपदक मिळवले आहे. तो जागतिक अॅथलेटिक्स अजिंक्यपद स्पर्धेतील तीन हजार मीटर स्टीपलचेसमध्ये याआधीच पात्र ठरला आहे.

### पारुलचीही चमक

२८ वर्षीय पारुल चौधरीने महिलांच्या पाच हजार मीटर धावण्याच्या शर्यतीत नवा राष्ट्रीय विक्रम रचला.

पारुलने १५ मिनिटे १०.३५ सेकंद वेळ नोंदवली. याआधीचा राष्ट्रीय विक्रम १५ मिनिटे १५.८९ सेकंद होता. तेरा वर्षांपूर्वी प्रीजा श्रीधरनने ही कामगिरी नोंदवली होती.

एकूण स्पर्धकांमध्ये पारुल नवव्या क्रमांकावर राहिली. साबळे आणि चौधरी दोन्ही सध्या अमेरिकेत सराव करीत आहेत.

### प्रवीणचाही विक्रम

तिहेरी उडीत प्रवीण चित्रवेलने राष्ट्रीय विक्रम रचला. त्याचबरोबर तो या वर्षीच्या जागतिक अॅथलेटिक्स अजिंक्यपद स्पर्धेसाठीही पात्र ठरला. क्युबामध्ये झालेल्या स्पर्धेत प्रवीणने १७.३७ मीटर लांब उडी घेतली. याआधीचा विक्रम १७.३० मीटर होता. २०१६मध्ये रणजित माहेश्वरीने हा राष्ट्रीय विक्रम रचला होता. बुडापेस्टमध्ये होणाऱ्या जागतिक अॅथलेटिक्स स्पर्धेसाठी पात्रता निकष १७.२० मीटर होता.

प्रवीणची याआधीची सर्वोत्तम कामगिरी १७.१८ मीटर होती. त्याने गेल्या वर्षी चेन्नईत झालेल्या आंतर-राज्य अॅथलेटिक्स स्पर्धेत ही कामगिरी नोंदवली होती. त्याने मारलेली १७.३७ मीटर उडी ही यंदाच्या मोसमातील दुसरी सर्वोत्तम कामगिरी ठरली आहे. प्रवीण सध्या क्युबात सराव करीत आहे.

# बीसीसीआयच्या हट्टामुळे पाकिस्तानला मोठा धक्का

। नवी दिल्ली ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।



बीसीसीआयच्या हट्टामुळे आता पाकिस्तानला मोठा धक्का बसला आहे. कारण आता आशिया चषक स्पर्धा पाकिस्तानमध्ये होणार नसल्याचे संकेत मिळत आहेत. आम्ही पाकिस्तानमध्ये खेळणार नाही, असे बीसीसीआयने ठणकावून सांगितले होते. त्यामुळे आता आशिया चषक पाकिस्तानाबाहेर होणार असल्याचे समोर येत आहे. आशिया चषक स्पर्धा ही काही करून पाकिस्तानातच खेळवणार, अशी भूमिका त्यांच्या क्रिकेट मंडळाने घेतली होती. पण भारताचा संघ काहीही करून पाकिस्तानात जाणार नाही. त्यानंतर आशिया चषक हा युएईमध्ये खेळवण्यात येईल असे म्हटले जात होते. पण आता युएईने आशिया चषकाकडे पाठ फिरवली आहे. त्यामुळे हा विश्वचषक आता युएईमध्ये होणार नाही, हे स्पष्ट झाले आहे.

आशिया चषकातील भारताचे सामने हे युएईमध्ये खेळवण्यात येणार होते. त्यामुळे या स्पर्धेचे यजमानपद हे पाकिस्तानकडे होते. पण युएईच्या क्रिकेट मंडळाने सांगितले की, सप्टेंबरमध्ये आमच्याकडे उन्हाचे प्रमाण जास्त असते आणि या गोष्टीचा फटका खेळाडूंना बसू शकतो, त्यामुळे आशिया चषक सप्टेंबर महिन्यात आमच्याकडे खेळवण्यात येऊ नये. त्यामुळे आता पाकिस्तानकडून या स्पर्धेचे यजमानपद जाणार आहे. कारण भारतीय संघ पाकिस्तानात खेळणार नाही आणि युएईने ही स्पर्धा खेळवण्यास नकार दिला आहे. त्यामुळे आता ही स्पर्धा श्रीलंकेत होऊ शकते, हे जवळपास निश्चित समजले जात आहे, पण याबाबत अधिकृत घोषणा झालेली नाही.